**अभ्युदय नगर**
**सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)**
(नोंदणी क्रमांक : एमयुएम/एमएचएडीबा/एचएसजी/टीसी)१२४९२/सन २००६–२००७)
कार्यालय : समाज मंदीर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई – ४०० ०३३.

जा. क्र. : १६/२०१७-२०१८ दिनांक : २८/०४/२०१७

प्रति,

**मा. अध्यक्ष / सचिव,**

अभ्युदयनगर ____________ सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.),

इमारत क्र. ........., अभ्युदयनगर,

काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.

**विषय : सॉलीसिटर फर्म / लिगल असोशिएटस् कं. ची नेमणूक करणेबाबत.**

**संदर्भ : दिनांक २६.०४.२०१७ रोजी दैनिक वर्तमानपत्र ''लोकसत्ता व टाईम्स ऑफ इंडिया'' मध्ये प्रसिद्ध झालेली जाहिरात.**

**महोदय,**

अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.) ने दिनांक २९.०३.२०१७ ते दिनांक ०६.०४.२०१७ या कालावधीत आयोजित केलेल्या अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाचे चित्रफितीद्वारे सादरीकरण व मार्गदर्शन या बैठकीस आपल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी व संस्थेचे सभासद हजर राहून पुनर्विकासाबाबत माहिती घेतली याबद्दल आपले सर्वांचे संघाचे वतीने आभार.

सदर सादरीकरण व मार्गदर्शन बैठकीत इमारती निहाय एकत्रित पुनर्विकासासंबंधी ज्या सुचना प्राप्त झालेल्या होत्या त्या सुचना दिनांक २६.०४.२०१७ रोजी श्री. चंद्रेश मेहता संचालक, मे. किस्टोन रिअॅल्टर्स प्रा.लि. विकासक, श्री. निखिल दिक्षित ऑफ मे.शिल्प असोशिएट्स, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व अॅड. श्री. आप्पासाहेब देसाई, कायदेशीर सल्लागार यांचेकडे पाठविलेल्या आहेत. सदर पत्राच्या झेरॉक्स प्रतीही आपल्या माहितीकरीता जोडलेल्या आहेत.

पान नं. २ वर....

आपल्या हे ही निदर्शनास आणून देण्यात येते की, मार्गदर्शन बैठकीत इमारती निहाय आलेल्या सुचनानुसार संघाने अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाच्या कायदेशीर प्रक्रियेकरीता ''सॉलीसिटर फर्म / लिगल असोशिएट्स कंपनी'' यांची नेमणूक करण्याचे ठरविलेले आहे व त्याकरिता दिनांक २६.०४.२०१७ रोजीच्या ''लोकसत्ता व टाईम्स ऑफ इंडिया'' या दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात दिलेली आहे. सदर जाहिरातीची झेरॉक्स प्रत आपल्या गृहनिर्माण संस्थेकडे सोबत पाठविण्यात येत आहे.

तरी सदर वृत्तपत्रातील जाहिरात आपल्या संस्थेच्या सभासदांच्या निदर्शनास आणून द्यावी, जेणेकरुन ते त्यांच्या माहितीत असणाऱ्या सॉलीसिटर फर्म / लिगल असोशिएट्स कं. यांना अवगत करुन देतील.

तरी अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाच्या महत्वाच्या कायदेशीर प्रक्रियेस आपण सहकार्य करावे ही नम्र विनंती.

**आपला विश्वासू,**

**सोबत : वरील प्रमाणे.**

अभ्युदय नगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
नोंदणी क्र.
एमयुएस/एमएच/
एडीबी / एचएसजी /
टी.सी) १२४१२ /
सन २००६-०७
मुंबई-३३.

**( जयसिंग शि. भोसले )**
**सरचिटणीस**

लोकसत्ता
अर्थसत्ता
WWW.LOKSATTA.COM ★ मुंबई, बुधवार, २६ एप्रिल २०१७ ११

## Required Solicitor Firm / Legal Associates Co.

For Cluster Re-development of Abhyudaya Nagar Consist of 47 Co-op. Housing Societies and 3410 Members Situated on 33 Acre Mhada's Land in South Central Mumbai.

Preparation & Finalization of Draft of Development Agreement (Between Abhyudaya Nagar Sangh and Developer), An Individual Agreement and Tri-party Agreement (Between Abhyudaya Nagar Sangh, Developer and Mhada).

Firm or Company shall have minimum 5 years experience in real estate re-development with project more than 10 lakhs sq. ft. FSI in Mumbai City.

Interested firm/company may send their seal offer with company profile within 10 (Ten) days to:

**Gen. Secretary,**
**Abhyuday Nagar Sahakari Gruhnirman Sansthancha Sangh (Maryadit)**
**Samaj Mandir Hall, Abhyudaya Nagar, Kalachowki – Mumbai – 400 033.**

Note: If any information is required for above feel free to contact on email ID:

**abhyudayanagarsangh@gmail.com**